# एका सर्जनशील महायोद्ध्याचा अस्त!

- अमोल पालेकर

काही माणसांच्या केवळ असण्याने बाकी सगळ्यांच्या असण्याला एक स्फुल्लिंग मिळतं. एक कोणीतरी पाठीराखा असतो की ज्याची थाप बाकीच्या सगळ्या झाकोळणा-या आवेगांचा प्रतिकार करण्याची शक्ती देऊन जाते. माझ्यासाठी गिरीश हा असा एक सज्जड पाठीराखा होता!

त्याच्या थोर साहित्यिक प्रवासाविषयी, ज्ञानपीठाची श्रेष्ठ मोहर लागल्यामुळे, आपल्या सगळ्यांना माहिती आहेच. भारतीय रंगभूमीच्या चार आधारस्तंभांपैकी गिरीश हा एक महत्त्वाचा खांब! अगदी ययाती-हयवदन-नागमंडल ते अलीकडचे फ्लॉवर्स-बिखरे बिंब-उणे पुरे शहर एक, या सगळ्या नाटकांच्या रंगमंचीय सादरीकरणाला आपण सगळ्यांनी आवर्जून दाद दिली आहे. संस्कारा, स्वामी, निशांत सारख्या सिनेमात सर्वांतःचा ठसा उमटवत असतानाच, कुमार शहानीच्या 'तरंग' मध्ये आणि बासू चटॅर्जीच्या 'अपने पराये'मध्ये त्याने माझ्यासोबत सहकलाकार म्हणून भूमिका केल्या होत्या. संध्यानी प्रमुख भूमिकेसाठी गिरीशला डोक्यात ठेवून 'समांतर'ची संहिता लिहिली होती. माझा दिग्दर्शकीय अधिकार वापरून ती भूमिका माझ्या पदरात पाडून घेतली. नाहीतर त्याच्यासोबत अजून एका सिनेमामध्ये काम करायची संधी मिळाली असती. तो बाकी संपूर्ण बावन्नकशी असला तरी अभिनेता म्हणून मीच उजवा आहे असे मी अगदी त्याच्या समोरही हक्काने म्हणत असे. असे हक्क असलेल्या माझ्या अगदी मोजक्या मित्रांपैकी एक आज मी गमावला...

१९६६मध्ये धोबीतलावच्या रंगभवनात सत्यदेव दुबे नामक एका तरुण दिग्दर्शकाने गिरीश कर्नाड नावाच्या एका तरुण नाटककाराच्या 'ययाती' या पहिल्यावहिल्या नाटकाचा नाटकाचा प्रयोग हिंदीत सादर केला होता. मी तेव्हा जे जे स्कूल ऑफ आर्ट्समध्ये होतो. एक अत्यंत देखणं आणि लाघवी व्यक्तिमत्व त्याक्षणीच मनात कोरलं गेलं होतं. त्यानंतरच्या काळात त्याची नाटकं वाचली, सिनेमे बघितले, थोड्या-बहुत गाठीभेटी झाल्या.

१९७२मध्ये हयवदन या त्याच्या नाटकाच्या हिंदी प्रयोगामध्ये दुबेनी मी, अमरीश पुरी, सुनीला प्रधान आणि दिना पाठक यांना एकत्र आणलं. लोकांनाच नव्हे तर गिरीशलाही तो प्रयोग अत्यंत आवडला होता. हयवदनचा मूळ प्रयोग बी व्ही कारंथ यांनी कन्नडमध्ये यक्षगण शैलीमध्ये केला होता. नाटकही त्याच शैलीमध्ये लिहिले असल्यामुळे तो प्रयोग एका वेगळ्या पद्धतीने संहितेशी प्रामाणिक असा

ठरला. परंतु दुबेनी त्यातला कॉस्च्युम ड्रामा संपूर्णपणे काढून टाकूनसुद्धा 'देवदत्तचं डोकं कपिलच्या शरीरावर लागणं' हा शारीरिक अनुभव, इतर कोणतीही बाह्य आयुधं/techniques न वापरता, फक्त कलाकारांच्या अभिनयाच्या ताकदीवर सादर केला. हा  वेगळा दिग्दर्शकीय दृष्टिकोन गिरीशला खूप भावला. त्यानिमित्ताने खूप विषयांवरच्या वेगवेगळ्या चर्चांना सुरुवात झाली.

मला स्वतःला गिरीशची नाटकं वाचताना एक दृश्यात्मक अनुभव यायचा. नाटकभर पसरलेल्या गोष्टीच्या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या पात्रांमधून एखादं क्यूबीस्ट चित्रं समोर यायचं. बघण्याचा कोन थोडासा बदलला की त्यातले अंतर्गत वेगवेगळे पैलू समोर येत राहायचे. वेगवेगळ्या दिग्दर्शकांनी केलेले 'हयवदन'चे प्रयोग बघितल्यावर वाटायचं की आपणही हे आव्हान हाती घ्यावं. कित्येक राहून गेलेल्या गोष्टींमधलं तेही एक!

वंदा नंदू काळंदली (Once upon a Time), चेल्लुवी आणि उत्सव या त्याच्या सिनेमाक्षेत्रातल्या दिग्दर्शकीय वाटचालीवर मी भरभरून दाद दिली होती. अगदी त्याच मनःपूर्वक असोशीने त्याच्या अलीकडच्या न आवडलेल्या कामाबद्दलही आम्ही मोकळेपणाने बोललो होतो. उदाहरणार्थ, त्याच्या आत्मचरित्राचा पहिला भाग आणि बाजारू पद्धतीने केलेली प्रसिद्धी! एकदा अशाच खास जमलेल्या बैठकीमध्ये त्याच्या साहित्यातील स्त्री-पात्रांविषयी आणि माझ्या सिनेमांमधल्या स्त्रीधार्जिण्या भूमिकेविषयी वाद उद्भवला. तुझी स्त्री-पात्रं कॅल्क्युलेटीव्ह का होती या माझ्या आक्षेपाच्या अनुषंगाने चर्चा झाली.

या सगळ्या वैचारिक, साहित्यिक संवादांपेक्षासुद्धा मला जास्त महत्त्वाचा वाटतो त्याचा समकालीन प्रतिगामी आणि सनातनी परिस्थिती विरुद्धचा थेट विद्रोह! फक्त मुलाखतींमधूनच नाहीतर स्वतः उपस्थित राहून तो अनेक निषेध मोर्चे-सभा यांमध्ये सक्रिय भाग घेत राहिला होता. असाध्य रोगाने गेली चार वर्षं त्याची साथ सोडली नाही; पण त्याची शारीरिक स्थितीही त्याच्या विद्रोहाला अटकाव करू शकली नाही. माझ्यासाठी हे फार महत्त्वाचं होतं. आजूबाजूला आपमतलबी, संधीसाधू आणि कुंपणावर बसणाऱ्या मंडळींचा सुळसुळाट असताना त्याच्यासारखा ध्रुवतारा दिशा दाखवत राहायचा.

या सगळ्या पलीकडे त्याचं एक फार मोठं भावनिक ऋण माझ्यावर आहे. मागच्या वर्षाच्या सुरुवातीला एक दिवस अचानक सकाळी सकाळी गिरीशचा फोन आला. अत्यंत सद्गदित स्वरात मला म्हणाला, "अमोल, तुला आजवर संगीत कला अकादमीचा एकही पुरस्कार मिळाला नाही? हे माझ्याही कसं

लक्षात आलं नाही? खरंतर मी गृहीत धरलं होतं की खूप पूर्वीच तुला ते मिळून गेलं असावं. ही फार मोठी चूक आहे आणि ती सुधारली नाही तर अकादमीचा सभासद म्हणून मी स्वतःला माफ करू शकणार नाही. मी या वर्षी फेलोशिपसाठी तुझं नाव सुचविणार आहे." त्याच्या मनाचा मोठेपणा मी पदोपदी अनुभवला होता, पण तो दिवस माझ्या कलेच्या प्रवासातली सर्वात मोठी पोच मला देऊन गेला. "आता खूप उशीर झाला आहे आणि डावललं जाण्याची मला सवय आहे. त्यामुळे तू नको प्रयत्न करुस! विशेषतः सध्याच्या सत्तारूढ पक्षाच्या राजवटीत तर ते अगदीच अशक्य असेल." हे माझं उत्तर मान्य न करता त्याने प्रयत्न केले. नऊ-दहा महिन्यांनंतर पुन्हा फोन करून "We failed you...I'm so sorry." असं म्हणून दिलगिरी व्यक्त केली. तुझं हे ऋण मी फेडू शकणार नाही, गिरीश!

गिरीशला मी शेवटचं भेटलो त्याच्या घरी, बंगलोरमध्ये २५ एप्रिल २०१९ला. "मी घेऊ शकणार नाही पण निदान तू तरी घे" असं म्हणून आग्रहाने माझ्या हातात व्हिस्कीचा ग्लास दिला होता. नंतर त्याच्या आणि सरससोबत रघूला नुकत्याच मिळालेल्या आंतरराष्ट्रीय पारितोषिकाच्या संदर्भात भरभरून गप्पा झाल्या होत्या. त्याची शारीरिक शक्ती झपाट्याने कमी होत असलेली त्याला जाणवत होते. पण मेंदू मात्र पूर्वीइतकाच तल्लख होता. त्याचा निरोप घेताना मनात कुठेतरी वाटून गेलं होतं की ही भेट शेवटची तर नसेल ना?

कधीही एखाद्या मुद्द्याविषयी समविचारी लोकांना ई-मेल पाठवून मनातली खदखद व्यक्त केली किंवा समकालीन प्रश्नांवर ऊहापोह केला तर पहिलं उत्तर यायचं ते गिरीशचं! २०१७ मध्ये माझ्या सेन्सॉरशिपच्या लढ्याची सुरुवात सुद्धा, उच्च न्यायालयात आमच्या याचिकेला समर्थन देणाऱ्या त्याच्या एफिडेविटनेच झाली होती.

यापुढेही गिरीश, मी तुला मेल पाठवतच राहीन... अगदी उत्तर येणार नाही हे माहिती असताना सुद्धा...

एका सर्जनशील महायोद्ध्याचा अंत झाला आहे हे मान्य करणं यानंतर खूप काळ कठीण जाणार आहे.